नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षासाठीची टर्न की फी (संयंत्र डागडुजी) वितरीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांकः बीजीएस २०२२/प्र.क्र. ५३/योजना-५**

**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,**

**फोर्ट, मुंबई- ४०० ००१**

**दिनांक:** मार्च, २०२५.

**वाचा :-**

१) केंद्र शासनाचे पत्र क्र. ३००/२/२०२०-Waste to Energy, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. १२६/१/२०२३- BIOGAS, दिनांक १० मे, २०२३.
३) ग्रा. वि. वि. शासन निर्णय क्रमांक बीजीएस-२०१८/प्र.क्र.९०/योजना-१, दि.१२ जुलै २०१९.
४) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/९/२०२३ - BIOGAS (Gen), दिनांक १६ जुलै, २०२४.
५) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/९/२०२४ - BIOGAS (SC), दिनांक १६ जुलै, २०२४.
६) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/९/२०२३ - BIOGAS (ST), दिनांक १६ जुलै, २०२४.
७) शासनाचे पत्र क्र. बीजीएस-२०२२/५३/योजना - ५, दिनांक २८ जून, २०२४.
८) शासन निर्णय क्र. बीजीएस-२०२२/५३/योजना - ५, दिनांक १४ ऑगस्ट, २०२४
९) शासन निर्णय क्र. बीजीएस-२०२२/५३/योजना - ५, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४

**प्रस्तावना**

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. उक्त संदर्भिय आदेश क्र. ४, ५ व ६ अन्वये सदर योजनेसाठी सन २०२२-२३ करीता राज्यस्तरावरील PFMS प्रणालीसाठी नोंदणी करण्यात आलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या बचत खाते क्रमांक १८८९०१०००९६७ वर अनुक्रमे रू. ७१३.८५ लक्ष, रू. ६४.२० लक्ष व रू.६९.३६ लक्ष असा एकूण रू.८४७.४१ लक्ष इतका निधी सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणालीवर (Public Finance Management System) Drawing Limit ने अनुदान उपलब्ध करून दिल्याचे कळविले आहे. संदर्भिय आदेश क्र. ३ अन्वये "नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम (NNBOMP)" या योजनेच्या अनुषंगाने, निधी आहरण व संवितरण करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

२. केंद्र शासनाचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ चे पत्रान्वये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता राज्यास ६००० बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट मंजूर केलेले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या मागणीनुसार एकूण ४५०० बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट कळविलेले आहे. सदर उद्दिष्टांच्या अनुषंगाने सन २०२२-२३ या वर्षाकरिता ३४ जिल्हयांकडील अनुदानासाठी मागणी प्राप्त झालेल्या एकूण ४८६३ बायोगॅस संयंत्र लाभधारकांना राज्यस्तरावरुन PFMS प्रणालीमधून अनुदानाचा थेट लाभ हस्तांतरणाद्वारे ( DBT) उपरोक्त संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णयानुसार वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच सदर

योजनेअंतर्गत संदर्भ क्र.९ नुसार टर्न की फीची रक्कम काही जिल्ह्यांना वितरीत करण्यात आली होती. आता उर्वरीत जिल्ह्यांना टर्न की फ़ीची रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रमासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता राज्यस्तरावरील PFMS प्रणालीसाठी नोंदणी करण्यात आलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या बचत खाते क्रमांक १८८९०१०००९६७ वर केंद्र शासनाच्या उक्त संदर्भ क्र. ४, ५ व ६ च्या आदेशान्वये एकूण ८,४७,४१,०५०/- (रू. आठ कोटी सत्तेचाळीस लाख एकेचाळीस हजार पन्नास फक्त) इतका निधी PFMS प्रणालीवर (Public Finance Management System) Drawing Limit ने उपलब्ध करून दिलेला आहे.

२. सदर निधीपैकी, या बचत खात्याचे “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित केलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी PFMS प्रणालीद्वारे संदर्भ क्र.८ च्या शासन निर्णयानुसार रुपये ७,६७,६३,७००/- (अक्षरी रुपये सात कोटी सदुसष्ट लाख त्रेसष्ट हजार सातशे फक्त) संबंधीत लाभार्थींना वितरीत केले आहेत. तसेच सदर योजनेअंतर्गत टर्न की फीचा पहिला हप्ता ५०% प्रमाणे प्रति बायोगॅस संयंत्रास रु. १,५००/- नुसार **रु. ४२,८२,५००/- ( अक्षरी रुपये बेचाळीस लाख ब्याऐंशी हजार पाचशे** फक्त ) इतकी रक्कम संदर्भ क्र. ९ च्या शासन निर्णयानुसार वितरीत करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत उर्वरीत जिल्ह्यांना टर्न की फीचा पहिला हप्ता ५०% प्रमाणे प्रति बायोगॅस संयंत्रास रु. १,५००/- नुसार **रु. ३०,१२,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख बारा हजार फ़क्त)** इतकी रक्कम “परिशिष्ट अ”नुसार जिल्हा निहाय वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम ही योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या संदर्भ क्रमांक १ व २ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अनुदानाचे दर लागू राहतील.

४. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रमासाठी PFMS प्रणालीद्वारे वितरीत केल्या जाणाऱ्या रक्कमेचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र (ज्यामध्ये अनुदान आहरित केल्याचा दिनांक, अनुदान आहरणाचे प्रयोजन, इत्यादी बाबीसह) महालेखाकार मुंबई व नागपूर यांना एप्रिल-२०२५ अखेरपर्यंत पाठविणे आवश्यक राहील. सन २०२२-२३ च्या उपयोगिता प्रमाणपत्रासंबंधी महालेखापाल कार्यालय मुंबई/नागपूर यांचेकडून मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्राप्त झालेले Clearances Certificate शासनास पाठविण्याची जबाबदारी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांची राहील.

५. नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम (NNBOMP) ही १००% केंद्र पुरस्कृत योजना असून, २० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा घटक असल्याने या योजनेतर्गत “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी सदर आदेशानुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी तातडीने संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना अनुदान PFMS प्रणालीद्वारे वितरीत करावे. तथापि वितरीत केलेल्या अनुदान खर्चाच्या लेख्यांचे लेखापरिक्षण करून घेण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हा परिषदांची राहिल. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषद ठाणे यांना पाठविण्याची जबाबदारी संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहिल.

६. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदांना दिलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने बाबनिहाय संपूर्ण अनुदान शासनस्तरावर PFMS प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने त्यानुसार जिल्हा परिषदांनी पूर्ण केलेल्या भौतिक उद्दिष्टांच्या अनुषंगाने संबंधितांच्या बँक खात्यामध्ये PFMS प्रणालीद्वारे टर्न की फीची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे ( DBT ) वितरीत करावी.

७. या शासन निर्णयानुसार, वितरीत करण्यात येणारे अनुदान हे केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडील पत्र क्र. ३००/२/२०२०-Waste to Energy, दि. ०२.११.२०२२ व दि. १०.०५.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटीं व शर्तींची काटेकोरपणे पूर्तता करण्याच्या अटीच्या अधिन राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक <संकेताक क्रमांक लिहा> असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संगिता गो. लांडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. महालेखापाल महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
७. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
९. जिल्हा लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
१०. संचालक, लेखा कोषागारे, महाराष्ट्र, मुंबई.
११. जिल्हा कोषगार अधिकारी (सर्व)
१२. नियोजन विभाग, कार्यासन १४४३/१४४४, मंत्रालय, मुंबई
१३. वित्त विभाग, मंत्रालय (व्यय-१५ /अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
१४. व्यवस्थापक, पंजाब नॅशनल बँक, शिल्पयान, शिवाजी पथ, जि. ठाणे ४०० ०६३
१५. कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-२, वित्त-७, वित्त-८, योजना-२, ग्राम विकास विभाग.
१६. निवड नस्ती, कार्यासन योजना-१, ग्राम विकास विभाग.

# “ परिशिष्ट अ ”

## सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात बायोगॅस कार्यक्रमा अंतर्गत टर्न की फी वितरीत करावयाचा तपशिल

| अ. क्र. | जिल्हा | सन २०२२-२३ करिता निश्चित केलेले उद्दिष्ट व साध्य | | | | | | | | | | टर्न की फी ची रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बायोगॅस संयंत्राचे प्रवर्गनिहाय उद्दिष्ट | | | | बायोगॅस संयंत्राचे प्रवर्गनिहाय साध्य | | | | | | | | |
| | | सर्वसाधारण | SC | ST | एकूण | सर्वसाधारण | SC | ST | ३ घ.मी. सर्वसाधारण | ३ घ.मी. SC | एकूण | प्रति संयंत्र रु. ३०००/- प्रमाणे टर्न की फी ची रक्कम | ५०% प्रमाणे (रु. १५०० प्रमाणे) देय रक्कम | वितरीत करावयाचे एकूण अनुदान रुपये |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | **ठाणे** | २० | ० | १० | ३० | २० | ० | १० | ० | ० | ३० | ९०००० | ४५००० | ४५००० |
| २ | पालघर | २६ | २ | ७० | ९८ | २१ | १ | ७३ | ० | ० | ९५ | २८५००० | १४२५०० | १४२५०० |
| ३ | रायगड | ८५ | ८ | १५ | १०८ | ८५ | ३ | १५ | ० | ० | १०३ | ३०९००० | १५४५०० | १५४५०० |
| ४ | रत्नागिरी | १०० | १८ | ० | ११८ | ९९ | १३ | ० | १ | ० | ११३ | ३३९००० | १६९५०० | १६९५०० |
| | १ घन मी | ० | ० | ० | ० | २ | १ | ० | ० | ० | ३ | ९००० | ४५०० | ४५०० |
| ५ | सिंधुदुर्ग | २२३ | ६ | ० | २२९ | २२३ | ६ | ० | ० | ० | २२९ | ६८७००० | ३४३५०० | ० |
| ६ | **नाशिक** | ९८ | १२ | २० | १३० | १०९ | ४ | १७ | ० | ० | १३० | ३९०००० | १९५००० | १९५००० |
| ७ | धुळे | ८ | ६ | ६ | २० | २ | २ | २ | ० | ० | ६ | १८००० | ९००० | ९००० |
| ८ | नंदुरबार | २० | ४ | २६ | ५० | २० | ४ | २६ | ० | ० | ५० | १५०००० | ७५००० | ७५००० |
| ९ | जळगांव | ६३ | ५ | ५ | ७३ | ५७ | ४ | ६ | ० | ० | ६७ | २०१००० | १००५०० | ० |
| १० | अहमदनगर | ४६७ | ३१ | १२ | ५१० | ४६७ | ३१ | १२ | ० | ० | ५१० | १५३०००० | ७६५००० | ० |
| ११ | **पुणे** | ४७५ | १८ | १२ | ५०५ | ४७५ | १९ | ८ | ३ | ० | ५०५ | १५१५००० | ७५७५०० | ७९५०० |
| १२ | सातारा | २३५ | ५ | ० | २४० | २२८ | ७ | ० | ५ | ० | २४० | ७२०००० | ३६०००० | ३२२५०० |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | सांगली | १८४ | ७ | ० | १९१ | १७३ | ७ | ० | ११ | ० | १९१ | ५७३००० | २८६५०० | २८६५०० |
| १४ | सोलापूर | १७० | ११ | १ | १८२ | १७० | ११ | १ | ० | ० | १८२ | ५४६००० | २७३००० | २७३००० |
| १५ | कोल्हापूर | १००० | १५ | ० | १०१५ | १००० | १५ | ० | ० | ० | १०१५ | ३०४५००० | १५२२५०० | ० |
| १६ | **छ. संभाजीनगर** | २३० | ३९ | २१ | २९० | १६३ | २९ | ६ | ० | ० | १९८ | ५९४००० | २९७००० | ० |
| १७ | जालना | ८५ | ८ | ० | ९३ | ४६ | ५ | ० | ० | ० | ५१ | १५३००० | ७६५०० | ० |
| १८ | परभणी | ८३ | १० | ० | ९३ | ८२ | १० | ० | १ | ० | ९३ | २७९००० | १३९५०० | १३९५०० |
| १९ | हिंगोली | ६८ | १५ | १० | ९३ | ६८ | १५ | १० | ० | ० | ९३ | २७९००० | १३९५०० | १३९५०० |
| २० | बीड | ८३ | ९ | १ | ९३ | ८४ | ७ | २ | ० | ० | ९३ | २७९००० | १३९५०० | १३९५०० |
| २१ | नांदेड | ७८ | १० | ५ | ९३ | ६५ | ६ | ५ | ० | ० | ७६ | २२८००० | ११४००० | ११४००० |
| २२ | धाराशिव | २१४ | २० | ० | २३४ | २२४ | १० | ० | ० | ० | २३४ | ७०२००० | ३५१००० | ३५१००० |
| २३ | लातूर | ११० | १० | ५ | १२५ | ११३ | ९ | ३ | ० | ० | १२५ | ३७५००० | १८७५०० | ० |
| २४ | **अमरावती** | १८ | ८ | ७ | ३३ | १५ | ६ | १० | २ | ० | ३३ | ९९००० | ४९५०० | ४९५०० |
| २५ | बुलढाणा | २८ | ३ | २ | ३३ | २८ | ४ | १ | ० | ० | ३३ | ९९००० | ४९५०० | ४९५०० |
| २६ | वाशिम | १२ | २ | २ | १६ | ६ | १ | ० | ० | ० | ७ | २१००० | १०५०० | १०५०० |
| २७ | अकोला | ९ | २ | १ | १२ | ६ | ० | १ | ० | ० | ७ | २१००० | १०५०० | १०५०० |
| २८ | यवतमाळ | १६ | ६ | ३ | २५ | ८ | ६ | ० | ० | ० | १४ | ४२००० | २१००० | २१००० |
| २९ | **नागपूर** | ३८ | १३ | ७ | ५८ | ३६ | १४ | ८ | ० | ० | ५८ | १७४००० | ८७००० | ० |
| ३० | वर्धा | ३५ | ३ | २ | ४० | ३५ | ३ | २ | ० | ० | ४० | १२०००० | ६०००० | ० |
| ३१ | भंडारा | ८५ | १६ | ८ | १०९ | ७४ | ६ | ४ | ० | १ | ८५ | २५५००० | १२७५०० | ० |
| ३२ | गोंदिया | ३९ | ० | १ | ४० | ३४ | १ | ० | ० | ० | ३५ | १०५००० | ५२५०० | ५२५०० |
| ३३ | चंद्रपूर | ३० | १० | २० | ६० | ३० | १० | २० | ० | ० | ६० | १८०००० | ९०००० | ९०००० |
| ३४ | गडचिरोली | १० | १५ | ४० | ६५ | ७ | १० | ४२ | ० | ० | ५९ | १७७००० | ८८५०० | ८८५०० |
| **एकूण** | | **४४४५** | **३४७** | **३१२** | **५१०४** | **४२७५** | **२९०** | **२७४** | **२३** | **१** | **४८६३** | **१४५८९०००** | **७२९४५००** | **३०१२०००** |